# सह जिल्हा निबंधक कार्यालय

## मृत्युपत्राचा सिलबंद लखोटा जमा करणे,परत घेणे व उघडणे

## सनद 3.8

### भाग 1- मृत्युपत्राचा सिलबंद लखोटा जमा करणे,परत घेणे व उघडणे साठी पक्षकाराकडुन करावयाची कार्यवाही-

1. मृत्युपत्रकर्ता किंवा त्याचा प्राधिकृत एजंट यांनी मृत्युपत्र बंद लखोटयात ठेवून तो लखोटा सह जिल्हा निबंधक यांचे कार्यालयात डिपॉझिट करणे व विहीत फी जमा करणे
2. लखोटयावर मृत्युपत्रकर्ता किंवा त्याचा प्राधिकृत एजंट (असल्यास) त्यांची नावे व दस्ताचे स्वरूपाचा तपशील नमूद करणे.
3. मृत्युपत्रकर्ता यांना असा डिपॉझिट केलेला लखोटा परत घेणेची इच्छा असल्यास, त्याने स्वत: किंवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत सह जिल्हा निबंधक यांचेकडे अर्ज करणे.
4. डिपॉझिट केलेला लखोटा उघडणेसाठी मृत्युपत्रकर्ता यांचे मृत्युनंतर सह जिल्हा निबंधक यांचेकडे अर्ज करणे.

### भाग 2- मृत्युपत्राचा सिलबंद लखोटा जमा केल्यानंतर सह जिल्हा निबंधक कार्यालयाने करावयाची कार्यवाही-

1. सिलबंद लखोटा सादर करणारे मृत्युपत्रकर्ता किंवा त्याचा प्राधिकृत एजंट आहेत काय याबाबत खात्री करणे.
2. लखोटयावरील तपशील व सीलमधील मजकुर तसेच ओळखदाराची नावे पुस्तक क्रमांक 5 मध्ये नोंदविणे
3. मृत्युपत्राचा लखोटा जमा करुन घेणेची फी घेणे व त्याची पावती देणे
4. मृत्युपत्र मयत झाल्याचा पुरावा असल्यास, संबधित अर्जदार यांचे उपस्थीतीत लखोटा उघडणे व उघडण्याची फी जमा करुन घेवून अर्जदाराच्या खर्चाने पुस्तक क्रमांक 3 मध्ये मृत्युपत्राची नक्कल करणे
5. नक्कल झाल्यानंतर,मूळ मृत्युपत्र कस्टडीत जमा करणे
6. लखोटा जमा केल्यानंतर,मृत्युपत्रकर्ता यांची इच्छा असल्यास व तसा अर्ज केल्याविहीत फी जमा करुन घेवून अर्जदार हे स्वतः मृत्युपत्रकर्ता किंवा त्यांचा अधिकृत प्रतीनिधी असल्याची खात्री करून लखोटा परत करणे